# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/06/2023 (सोमवार) सकाळ

---

## घरफोडी

**१) पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील धंतोली पार्क प्लॉट क्र. ०२ येथे दिनांक ०४/०६/२०२३ चे ०२.०० वा. ०४.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— स्वप्नील अनिलराव धोटे, वय ४२ वर्ष रा. धंतोली पार्क प्लॉट क्र. २ यांची काकु ही मुक्कामी वर्धा येथे मुलीसोबत गेली व सकाळी ६.०० वा. दरम्यान फियादीच्या आईला फोन करून सांगितले की, रात्री २ ते ४ वा. दरम्यान माझ्या घरी चोरी झालेली आहे. तुम्ही जावुन पहा असे म्हटले असता दरवाज्याची पाटी तुटलेली दिसली असुन दरवाजा आतुन बंद होता. घराच्या मागच्या दिशेने आत जावुन पाहीले असता घरातील सामान अस्ताव्यस्त फेकलेले असुन लोखंडी कपाटात पर्समध्ये ठेवलेले नगदी ६०००/— रू. तसेच बेडरूममध्ये बॅगमधील ५०००/— रू. बेडरूममधील लाकडी कपाटात ठेवलेले ४०००/— रू. चांदीच्या प्रत्येकी २ ग्रॅम वजनाच्या ४ अंगठया किंमती अंदाजे १०००/— रू. असा एकुण १६०००/— रूपयाचा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अशोक देशमुख काटोल पोलीस ठाणे मो. नं. ९६६५६१५२९५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत सुरेश नगर कन्हान येथे दिनांक ०३/०६/२०२३ चे ११.०० वा. पासुन ते दिनांक ०४/०६/२०२३ चे ०४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— विजय विठ्ठलराव सत्तेरकर, वय ५२ वर्ष, रा. सुरेश नगर, कन्हान यांच्या राहत्या घरातील ३ एच. पी. ची मोटार किंमती अंदाजे ५०००/— रू व टिल्लुपंप किंमती २०००/— रू. असा एकुण ७०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे कुलुप फोडुन घरात प्रवेश करून चोरी करून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सतिश फुटाणे ब. नं. ८२४ मो. नं. ९५१८३३४७२३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर